# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ११२–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. शरद नानासाहेब कदम,<br>मु. पो. वडीयेरायबाग, कडेगांव, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, विटा, जि.सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, विटा १, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**<u>कोरम</u> :–** १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. शरद नानासाहेब कदम, मु. पो. वडीयेरायबाग, कडेगांव, जि. सांगली यांनी नवीन शेतीपंपासाठी वीज कनेक्शन मिळावे यासाठी वि.प.कडे अर्ज करुन पावती क्र. ०१३२३५७ दि. ५.३.२०१० ने भरले व दि. ५.३.२०१० रोजी चाचणी अहवाल दिला. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार दि. ४.४.२०१० पर्यंत कनेक्शन मिळणे जरुरी होते. तसे झाले नाही, त्यामुळे प्रस्तुतची तक्रार दाखल केली आहे. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. १२.४.२०१० रोजी रितसर तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने दि. ७.५.२०१० च्या आदेशानुसार तक्रारदारास एस.ओ.पी. विनियमाला बांधील राहून नमूद केलेल्या कालावधीत वीज पुरवठा करावा अन्यथा भरपाई द्यावी असे आदेश केले आहेत. तक्रारदार यांनी दि. ४.६.२०१० रोजी अनुसूचि अ मध्ये मंचाकडे तक्रार दाखल केली. त्यामध्ये त्यांनी विलंबापोटी कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. २८.६.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदाराचे वीज कनेक्शन दि.२१.६.२०१० रोजी देण्यात आलेले आहे असे नमूद केले आहे. तसेच तक्रारदाराचा तक्रार मागे घेत असल्याबद्दलचा अर्ज हजर केला आहे.

प्रस्तुतची तक्रार दि. २९.६.२०१० ला मंचासमोर सुनावणीस घेतली असतां, तक्रारदार हजर नव्हते. तक्रार प्रतिनिधी हजर नव्हते. वि.प.तर्फे श्री. चिकोडे, सहाय्यक अभियंता, विटा १ उप विभाग, श्री. पाटणकर, कनिष्ठ अभियंता हजर होते. मंचाने तक्रारदारास मंचासमोर हजर राहून तक्रार मागे घेतल्याबद्दलच्या पत्रावरील सही बाबत खात्री देण्याबाबत आदेश दिले. त्याप्रमाणे तक्रारदार प्रतिनिधी यांनी दि. २८.७.२०१० रोजी मंचासमोर हजर राहून वीज कनेक्शन मिळाल्यामुळे तक्रार मागे घेत असल्याचे तक्रारदाराचे लेखी पत्र मान्य केले व सही तक्रारदाराचीच असल्याचे मान्य केले.

खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार यांस मागणी केल्याप्रमाणे विलंबापोटी भरपाई मिळणे योग्य होईल काय ?

उत्तर : नाही

आदेश ?

खालील प्रमाणे.

<u>कारणमिमांसा</u>

तक्रारदार यांनी नवीन शेतीपंपाच्या कनेक्शनसाठी दि. ५.३.२०१० रोजी पैंसे भरुन टेस्ट रिपोर्ट दिला. वि.प.ने दि. २१.६.२०१० रोजी कनेक्शन दिल्याचे सांगितले आहे. तक्रारदाराने व तक्रारदार प्रतिनिधी यांनी त्यांची तक्रार मागे घेत असल्याचे दि. २८.६.२०१० चे पत्र मंचासमोर हजर केले आहे. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देणेत येत आहे. खालील प्रमाणे आदेश –

## <u>आदेश</u>

१) तक्रार निकाली काढणेत येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : (जी.बी.पानकर,)

सदस्य सचिव

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )

अध्यक्ष